राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. २६५/२०२३/जळगाव**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. विनायक श्रावण पाटील,<br>रा. मु. पो. अंजनविहीरे,<br>ता. भडगाव, जि. जळगाव. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय,<br>अंजनविहीरे, ता. भडगाव,<br>जि.जळगाव. | गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, भडगाव,<br>ता. भडगाव, जि. जळगाव. |

**सुनावणी दिनांक — ०८/०८/२०२४**

**उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

१. **द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : दि. १२/०१/२०२३

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहितीची फी भरणा केल्यावर सुध्दा माहिती न मिळाल्याने.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही.

२. **माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २७/०९/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २७/०९/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दि. ०१/०१/२०१८ ते २०/०१/२०२१ पर्यंत.

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**

१) १४ वा वित्त आयोग अनुदानातून जी कामे झाले असतील त्या सर्व कामांच्या माल खरेदी खर्चाच्या बिलाच्या पावत्या मजुरीच्या बिलांच्या पावत्या, मुल्यांकन अहवालाची प्रत, इस्टीमेटची प्रत, तांत्रिक मान्यता प्रत, तसेच किर्दची सत्य प्रत.

२) वरील कालावधीमध्ये १४ वा वित्त आयोग अनुदानचे बँकेचे पासबुक सत्य प्रत मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. १८/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये रक्कम रु. ११२९७/- भरणेबाबत कळविले आहे.

३. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २४/११/२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २५/११/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : चलनाद्वारे शासकीय कोषागारात भरणा केल्यावर सुध्दा माहिती न मिळाल्याने.

(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २४/१२/२०२१ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारीत केले असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दि. १८/१०/२०२१ च्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती अधिकार अर्जात (एकुण १ ते ५) नमुद केलेली संपुर्ण माहिती हे पत्र मिळाल्यापासुन ८ दिवसाचे आत विनाविलंब पुरवावी. असे आदेशित करुन

प्रथम अपिल निकाली काढले आहे.

४. **युक्तिवाद/लेखी खुलासा** — सुनावणीवेळी उपस्थित अपिलार्थी यांनी असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांना माहिती मागितली असता त्यांनी माहिती दिली नाही. तसेच दि. २०/११/२०२१ रोजी शुल्क भरणा केलेला असून देखील माहिती दिली नाही असे स्पष्ट केले.

५. **निष्कर्ष** —

- अपिलार्थीने केलेल्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. १८/१०/२०२१ च्या पत्रान्वये शुल्क भरणेबाबत कळविल्याचे दिसून येते.
- अपिलार्थी यांनी दि. २०/११/२०२१ रोजी विहीत मुदतीत शुल्क भरणा करुन सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही.
- तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी पंचायत समिती भडगाव यांनी प्रथम अपिल अर्जावर सुनावणी घेऊन आदेश पारीत केल्याचे दिसून येते.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्राम पंचायत अंजनविहीरे, ता. भडगाव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दि. २७/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत अंजनविहीरे, ता. भडगाव यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा तात्काळ आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक २६५/२०२३/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भडगाव, ता. भडगाव, जि. जळगाव.

यांना कळविण्यात येते की, त्यांनी आयोगाच्या आदेशाची एक प्रत संबंधितांना बजावून आयोगाकडे विहित मुदतीत लेखी खुलासा सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे.

जावक क्र. ३९९० 29 APR 2025